महाराष्ट्र शासन

# पोलीस अधीक्षक कार्यालय,चंद्रपूर

Email ID : sp.chandrapur@mahapolice.gov.in Phone No.07172-255100/273258, Fax No.07172-255800

क्रमांक पोअचं/आस्था-१/पो.भ.२०२४-२५/नियुक्ती/आदेश/पोशि/२०२६ चंद्रपूर, दिनांक २८.०५.२०२६

## -: नियुक्ती आदेश :-

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस अधिक्षक, चंद्रपुर आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम २०१९ मधील तरतुदी व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारीत तरतुदी नुसार पोलीस शिपाई (गट-क अराजपत्रीत) पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

**पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम २०१९ नुसार पोलीस भरती-२०२४-२५ मध्ये एकुण २१५ उमेदवारांपैकी १२६ उमेदवार यांची शारीरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी, चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणीमध्ये ते पात्र ठरल्याने त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन ) नियम २०१९ अन्वये वेतन मॅटिक्स मधील वेतन स्तर एस-७ रु. २१७००-६९१०० व विशेष वेतन रु ७५०/- (महागाई भत्ता लागु असलेले इतर भत्यासह ) मध्ये पोलीस शिपाई पदी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग -१ प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे.**

**उर्वरीत उमेदवार यांना त्यांचे वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी तसेच समांतर आरक्षणाचे कागदपत्रे तपासणीत पात्र ठरल्यास त्यांचे पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.**

| अ.क. | उमेदवाराचे संपुर्ण नांव | जात | नियुक्ती प्रवर्ग | नेमणुकीचे ठिकाण | समांतर आरक्षण | आस्थापनेवरील दिलेला बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दिनेश बिबीषन कुंडगिर | हटकर | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २ |
| ०२ | करण तेजराम अवसरे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४ |
| ०३ | राहुल राजेंद्र मेहकुरे | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४२ |
| ०४ | सुरज दिनकर जिवतोडे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४३ |
| ०५ | मनोहर चंपत गजबे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ६७ |
| ०६ | यज्ञेश अशोक गोडे | सोनार | ओबीसी | पो. मु. चंद्रपुर | पोलीस पाल्य | ६८ |
| ०७ | रोहन अनंत क्षिरसागर | धोबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ७७ |
| ०८ | निकेतन किशोर जिवतोडे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ९५ |
| ०९ | सौरभ शंकर बोधे | धनगर | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ९६ |
| १० | सागर सुखदेव गजभे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १०७ |
| ११ | सुरज देविदास केळझरकर | गाडी लोहार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ११४ |
| १२ | अजित शिवाजी कांबळे | मांग | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १२२ |
| १३ | राकेश बकाराम नन्नावरे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १२९ |
| १४ | अभय विश्वनाथ पंचभाई | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १३० |
| १५ | सुरज अशोक नैताम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १४६ |
| १६ | अमन शंकर ढाकरे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १६४ |
| १७ | अभय मधुकर महानुर | हटकर | एनटी सी | पो. मु. चंद्रपुर | प्रकल्पग्रस्त | १७९ |
| १८ | राकेश मारोती सोयाम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १८८ |
| १९ | आशीष गुलाब धारणे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १९२ |
| २० | सुदाम सोपान घुगे | वंजारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | १९६ |
| २१ | प्रज्वल प्रदिप रायपुरे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २०३ |
| २२ | गुलशन ओमप्रकाश जाधव | बंजारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २०६ |
| २३ | दयानंद मानिक हरगिले | मांग | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २१२ |
| २४ | तरबेज नाजीम सय्यद | मुस्लीम | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २१८ |
| २५ | विलास किसन राठोड | बंजारा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | २२६ |
| २६ | अरविंद प्रमोद बेलेकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | २५८ |
| २७ | सतिश विष्णु मोतेकर | धोबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | २७७ |
| २८ | राकेश रतन झोडे | कोहाळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | २९३ |
| २९ | विवेक संभाजी रामटेके | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३०० |
| ३० | ज्ञानेश्वर मारोती धोटे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३०७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | सुरज सुभाकर मारुळे | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३०८ |
| ३२ | लोकेश राजेंद्र कडयाम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३०९ |
| ३३ | कुणाल बंडु उपरे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३२३ |
| ३४ | विकास अशोक वावरे | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३२६ |
| ३५ | अनिकेत सुरेश देवाळकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३३३ |
| ३६ | प्रथमेश गणेश आडसुळ | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३३६ |
| ३७ | निखील बबन मिलमिले | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३४७ |
| ३८ | मोरेश्वर सुरेश राऊत | माळी | ओबीसी | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | ३४८ |
| ३९ | सचिन जगन्नाथ ठेंग | राजपुत | खुला | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | ३७५ |
| ४० | सुरज देवराव गेडाम | परधान | खुला | पो. मु. चंद्रपुर | होमगार्ड | ३७९ |
| ४१ | तिरुपती भिमराव कोटनाके | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३८४ |
| ४२ | सुजित रमेश जुनघरे | भोई | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ३८९ |
| ४३ | लखनसिंग सुधाकर राठोड | बंजारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४२४ |
| ४४ | अभिजीत सुभाष जाधव | बंजारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४४५ |
| ४५ | गोपाल विनोद वरपटकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४५० |
| ४६ | सुरज विनोद वरपटकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४५६ |
| ४७ | कुंदन अनिल डोडरे | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४७० |
| ४८ | अभय संजय शिवणकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ४८५ |
| ४९ | रोहन योगेश्वर पडोळे | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५१६ |
| ५० | प्रतिक देवराव करमरकर | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५२६ |
| ५१ | मनोज रविंद्र इरबतनवार | सालेवार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५३४ |
| ५२ | दुर्योधन देवाजी शेंडे | ढिवर | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५४४ |
| ५३ | अजय रमेश निकुरे | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५४७ |
| ५४ | प्रेम दिगांबर पोघे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५५२ |
| ५५ | स्वप्नील भाऊराव जिनेवाड | कोळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५७१ |
| ५६ | श्रीकिसन रामप्रसाद कांबळे | कोळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५९१ |
| ५७ | अनिकेत रमेश आत्राम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५९२ |
| ५८ | तेजस जयंत डाखोरे | ब्राम्हण | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ५९७ |
| ५९ | सतिश सुभाष पवार | बंजारा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ६०० |
| ६० | किरण भगवान माने | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ६०३ |
| ६१ | श्रीकांत मदन बडघरे | रंगारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | -- | ६१२ |
| ६२ | प्रदिप नथ्थुजी आसुटकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६१६ |
| ६३ | संतोष चंद्रभान शेंडे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६२२ |
| ६४ | मनोज प्रभाकर काडुकर | न्हावी | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६२६ |
| ६५ | प्रफुल राजु भगत | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६३६ |
| ६६ | भय्यालाल शंकर बुराडे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६४६ |
| ६७ | मंगेश रंगराव खैरकार | धनगर | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६५० |
| ६८ | सतीश यादव टाकरे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६५८ |
| ६९ | विजय वामन पिंपळशेंडे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | माजी सैनिक | ६५९ |
| ७० | इकबाल राजखा पठाण | मुस्लीम | खुला | पो. मु. चंद्रपुर | प्रकल्पग्रस्त | ६६१ |
| ७१ | रोहीनी महीपती सोडनरे | हटकर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ६९० |
| ७२ | प्रणाली अनिल कुंभारे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ६९२ |
| ७३ | पुजा रमेश मांदाडे | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७०० |
| ७४ | साक्षी रमेश कडते | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७०१ |
| ७५ | साक्षी मधुकर पिंपळशेंडे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७०४ |
| ७६ | सोनुताई ओमप्रकाश जाधव | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७१३ |
| ७७ | अर्चना पांडुरंग राठोड | बंजारा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७३७ |
| ७८ | हर्षाली सुखदेव दडमल | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७३८ |
| ७९ | मोनिका मोहन टवरे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७४३ |
| ८० | रुतुजा अंकुश गंधारे | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७५४ |
| ८१ | समिक्षा योगेश जगताप | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७५५ |
| ८२ | साक्षी अशोक गेडाम | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७५६ |
| ८३ | अश्विना श्यामसुंदर श्रीरामे | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७६१ |
| ८४ | आईशा जब्बारखान पठाण | मुस्लीम | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७६३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८५ | दिक्षा आनंदराव राठोड | बंजारा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७६८ |
| ८६ | वैष्णवी माधव दुधाटे | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७६९ |
| ८७ | प्रविना सिताराम कोकोडे | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७८२ |
| ८८ | वैष्णवी धनराज सातपुते | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७८५ |
| ८९ | नंदिनी रोहीदास देवकते | हटकर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७८९ |
| ९० | शिवानी बंडु शेंडे | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ७९३ |
| ९१ | केतना गणेश तिवाडे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८०० |
| ९२ | स्नेहा उमाजी चौधरी | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८१२ |
| ९३ | अश्विना केशव पारधी | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८१८ |
| ९४ | शुभांगी विठ्ठल शतपलकर | जनगम | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८१९ |
| ९५ | विद्या विलास कदम | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८२१ |
| ९६ | भाग्यश्री मारोती बुच्चे | धनगर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८३७ |
| ९७ | हर्षवर्धना भालचंद्र कातकर | महार | एस सी | पो. मु. चंद्रपुर | पोलीस पाल्य | ८३९ |
| ९८ | वैष्णवी विठ्ठल रामटेके | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८४८ |
| ९९ | शिवानी भाष्कर गुरनुले | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८५५ |
| १०० | मोहीनी मनराज बनकर | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८७१ |
| १०१ | सोनी अनिल देवगडे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८८० |
| १०२ | साक्षी शंकर पेंदोर | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८८८ |
| १०३ | कावेरी प्रमोद तुपट | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ८९९ |
| १०४ | पल्लवी संतोष बोटरे | गोवारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९०० |
| १०५ | रुक्षाली प्रकाश दिघोरे | ढिवर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९०७ |
| १०६ | शिरीन परवीन बेग | मुस्लीम | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९३२ |
| १०७ | अरुणा कालीदास घोडाम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९५० |
| १०८ | नगीना दुर्योधन दडमल | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९५३ |
| १०९ | सुप्रिया राजु बालुगवार | कुरमर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९५४ |
| ११० | प्रियाली प्रकाश वासेकर | तेली | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९५९ |
| १११ | प्रतिक्षा संजय सोनुले | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९७६ |
| ११२ | अक्षता शालिक गुरनुले | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९८५ |
| ११३ | स्वाती राजु सोनुले | माळी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ९९६ |
| ११४ | निकीता दिपक पोपटे | महार | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १०३७ |
| ११५ | ऋतुजा हनुमान जाधव | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १०७२ |
| ११६ | वैष्णवी देवाजी कारसोरपे | गोवारी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १०९४ |
| ११७ | प्रिती बंडु सलाम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११०२ |
| ११८ | प्रतिक्षा परसराम दडमल | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११०७ |
| ११९ | सुजाता रंगनाथ कणसे | मराठा | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११५४ |
| १२० | प्रगती शत्रुध्न आसुटकर | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११५६ |
| १२१ | रविना एकनाथ मेश्राम | गोंड | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११६२ |
| १२२ | अश्विनी शंकर साळवे | कुणबी | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | ११९४ |
| १२३ | मंजुषा चंद्रभान दडमल | माना | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १२२० |
| १२४ | तन्नु राजु फोपारे | धनगर | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १२२२ |
| १२५ | मुस्कान इस्माईल शेख | मुस्लीम | खुला | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १२२३ |
| १२६ | प्राची श्रीराम नरुले | कुणबी | ओबीसी | पो. मु. चंद्रपुर | महिला आरक्षण | १२३४ |

**अटी व शर्ती :-**

१) सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यात येईल.

२) महाराष्ट शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्रक्र २६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ६ महिन्यांचे आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहिल. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आत निकाली काढणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी

समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हास दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल व तुमच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मधील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल. मागासवर्गीय उमेदवाराची खुल्या प्रवर्गातून निवड झाली असली तरी, सदर उमेदवारास त्यांचे पदोन्नतीसाठी आरक्षित असलेल्या पदोन्नती पदावर पदोन्नती मिळण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३) पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकूल फेर अहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. तसेच पोलीस भरतीच्या वेळी आपण सादर केलेली शिक्षण, वय, धर्म, जात, अधिवास, नॉन क्रिमीलेअर, क्रिडा, प्रकल्पग्रस्त, गृहरक्षक, माजी सैनिक, पदवीधर/ पदवीकाधारक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे खोटी आढळुन आल्यास तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येवून तुमचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) भरती प्रक्रिया सुरु असतांना किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी आपण अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा निवड होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच विहित अर्हता/ निकषांची पुर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास आपली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल. त्याबाबत कोणताही दावा/ तक्रार करण्यास कोणताही हक्क राहणार नाही.

५) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological test) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

६) प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

७) प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही.

८) प्रशिक्षण कालावधीत/ अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना/ नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यात येईल.

९) पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणात/प्रशिक्षण पुर्ण करण्यात स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास/ भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १ मधील नियम ७८ उपनियम (१) मधील viii खालील टिप नुसार तुमची सेवा समाप्त (Terminate from service) करण्यात येईल.

१०) पोलीस शिपाई नियुक्त झालेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांना राज्यातील कोणत्याही पोलीस प्रशिक्षण केंद्रात आवश्यक असलेले प्रशिक्षण पूर्ण करुन संबंधित परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर तो चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. तसेच सदर नियमातील उपखंड (२) मधील तरतुदीनुसार वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधित परीक्षा विहीत संधीत उत्तीर्ण झाल्यास, रोखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

११) पोलीस शिपाई निवड करण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाही. मात्र हे उमेदवार विनंतीनुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र ठरतील. तसेच सदर नियमातील उपखंड (२) मधील तरतुदीनुसार पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेला कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून इतर पोलीस घटकात बदलीसाठी, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य शासनाच्या मान्यतेने निर्धारीत केलेली बदलीसाठी पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, जेष्ठता आणि इतर अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र राहील.

१२) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर या पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/ गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, तो घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केव्हाही बदलीस अपात्र होतील.

१३) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर या पोलीस घटकाचे अधिकार क्षेत्रात आपण बदलीस पात्र रहाल.

१४) ज्या संवर्गातुन / जातीच्या प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग/ प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

१५) पोलीस शिपाई पदावर रुजु झाल्या तारखेपासून ३ महिन्याचे आत उमेदवारांने महाराष्ट्र शासन, सार्वजनिक प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वसीअ १२१४/प्रक्र २६/११, दिनांक ०२ जून २०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व (Assets and Liablilities) बाबतचे विवरणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.

१६) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व नंतर निवड होणा-या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (डीसीपीएस) / लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच
महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्रमांक अंनियो २०१२/प्रक्र ९६/सेवा ४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना या नावाने लागू होईल.

१७) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो २०२२/प्रक्र ३४/सेवा ४ दिनांक ३१ मार्च २०२३ मधील १(अ) अन्वये सेवेत असताना मृत्यु झाल्यास आपल्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान लागु करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक ३१ मार्च २०२३ मधील १(ब) अन्वये रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता आणि सेवा उपदान लागु करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कुटुंब निवृत्तिवेतन धारकास व रुग्णता निवृत्तिवेतन धारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन/रुग्णता निवृत्तिवेतन लागु होईल. दिनांक ३१ मार्च २०२३ मधील १(क) अन्वये शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान लागु करण्यात आले आहे. वरील निर्णयानुसार प्रदान करण्यात येणा-या सेवा उपदान व मृत्यु उपदानाच्या प्रयोजनार्थ सद्य:स्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतुदी लागु राहतील.

१८) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो २०२२/प्रक्र ३४/सेवा ४ दिनांक ३१ मार्च २०२३ मधील ४ च्या तरतुदीनुसार शासकीय सेवेत नियुक्ती होणारा कर्मचारी यांनी त्यांचा सेवेत असताना मृत्यु
झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ प्रमाणे कुटूंब निवृत्तीवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्याबाबत अथवा राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत त्याची कायम निवृत्तिवेतन लेखा क्रमांक (PRAN) मध्ये जमा असलेली संचित रक्कम निवृत्तिवेतन निधि विनियमक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांनी वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अनुक्रमे कुटूंबास किंवा त्याला मिळण्याबाबतचा नमुना २ मध्ये विकल्प शासन सेवेत नियुक्त झाल्यावर ८ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

१९) जे शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ प्रमाणे कुटूंब निवृत्तीवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा विकल्प सादर करतील, त्यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो २०२२/प्रक्र ३४/सेवा ४ दिनांक ३१ मार्च २०२३ सोबतचा नमुना १ प्रमाणे कुटंबाचा तपशील सादर करणे अनिवार्य आहे.

२०) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो २०२२/प्रक्र ३४/सेवा ४ दिनांक ३१ मार्च २०२३ अन्वये शासन सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान लागू करण्यात आले आहे.

२१) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०००/प्रक्र १७/२०००/बारा, दिनांक २८ मार्च २००५ व क्रमांक एसआरव्ही २०००/प्रक्र १७/२०००/बारा, दिनांक ०१ जुलै २००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र) नियम २००५ मधील नियम ४ नमुना अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत राहण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

२२) महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्रमांक पीएसबी ३११/प्रक्र ५२१/पोल ५ अ, दिनांक २६ सप्टेंबर २०११ व अपर पोलीस महासंचालक (सध्या पोलीस महासंचालक), प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील पत्र क्रमांक प्रशि/पोशि भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २६ एप्रिल २०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडुन त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितके महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च वसुल करण्यात येईल व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे आपणास बंधनकारक आहे.

२३) आपणास आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास नियुक्ती प्राधिकरणास १ महिन्याची आगावू नोटीस द्यावी लागेल अथवा १ महिन्याच्या नोटीसच्या बदल्यात १ महिन्याच्या पगाराएवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे प्रथम भरावी लागेल. तसेच आपल्याविरुध्द कोणतीही चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित असता कामा नये, अथवा शासकीय येणी बाकी असता कामा नयेत पोलीस शिपाई पदाचा राजीनामा मंजुर
झाल्या नंतर कोणत्याही परिस्थितीत पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

२४) पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली, १९५९ भाग १ मधील नियम क्रमांक ७८ (१) (v) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यात येईल. अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपलि) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

२५) महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण झाला असेल, किंवा होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर सुट देण्यात येईपर्यंत वेतनवाढ रोखण्यास पात्र ठरतील.

२६) नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजा, सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी

सेवा नियम व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील विहीत केलेले अन्य नियम व तरतुदी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश परिपत्रके लागू राहतील.

२७) उमेदवारास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल तसे करणे बंधनकारक राहील.

२८) नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपुर्वी त्यांनी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२९) सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम २०११, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश नियम २०११) व महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १०१७/३८४३/प्रक्र ४६९/पोल ५ ब दिनांक २६/१०/२०१७ मधील तरतूदीनुसार घटक बदली नियमावली लागू राहील.

३०) नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवार यांनी, नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांचे आंत पोलीस अधीक्षक, चंद्रपूर आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर रुजु व्हावे लागेल. विहीत मुदतीत उमेदवार रुजु न झाल्यास तर तो ही नियुक्ती स्विकारण्यास तयार नाही असे गृहीत धरुन, करण्यात आलेली निवड रद्द करण्यात येईल त्यानंतर त्यांचा या नेमणुकीस कोणताही हक्क राहणार नाही.

३१) या आदेशानुसार सदर नियुक्तीवर हजर होण्यासाठी उमेदवाराला जो खर्च करावा लागला त्या खर्चाची प्रतिपुर्ती शासनाकडुन केली जाणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय होणार नाही.

३२) उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्याने पुर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या जिल्हयाचे आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येईल.

३३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्रक्र ६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता आपल्या नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

३४) उमेदवारास सेवापटात नोंदविलेल्या जन्मतारखेत फेरबदल करावयाचा असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासुन पाच वर्षाच्या कालावधीत योग्य त्या पुराव्यासह सक्षम प्राधिकरणामार्फत शासनाकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सादर केलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

(आयुष नोपानी, भापोसे)
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

प्रति,

वरील नमुद संबंधीत उमेदवार.
**मार्फत**:- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, चंद्रपुर

प्रतिलिपी :- राखीव पोलीस निरीक्षक (मुख्यालय), चंद्रपूर.

२/- आदेशातील नमुद उमेदवार हे पोलीस मुख्यालय चंद्रपूर येथे उपस्थित झाल्यानंतर त्यांना हजर करुन घेण्यात यावे व त्यांचा हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास सादर करावा उमेदवाराची निवास व्यवस्था करावी तसेच देखभालीकरीता वार्डन कर्मचारी नेमावेत उमेदवारांना नियमानुसार संरजाम व किट साहित्य पुरवावे. उमेदवारांकडुन मेस अग्रिम ३०००/- रुपये स्विकारुन ती रक्कम मेस अग्रिम करीता जमा करावी तसेच त्यांचे सेवापट तयार करण्याकरीता ०३ पासपोर्ट साईज गणवेशातील फोटोसह त्यांना पोलीस अधिक्षक कार्यालय, आस्थापना शाखा येथे कार्यालयीन वेळेत कवायत निदेशक सोबत पाठविण्यात यावेत.

प्रत - प्रमुख लिपीक लेखा शाखा/वेतन लिपीक लेखा शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर.

३/- वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/प्रक्र १२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ अन्वये सदर नवप्रविष्ठ उमेदवारांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्टीय निवृत्ती वेतन योजना फॉर्म भरुन त्यांचे वेतनातुन अंशदानाची रक्कम कपात करण्याची व शासनाकडुन खाते क्रमांक प्राप्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच त्यांचे वेतन बॅकेमार्फत होत असल्याने प्रत्येक उमेदवाराचे एसबीआय मध्ये खाते उघडण्याची कार्यवाही करावी.

प्रत :- प्रभारी पोलीस अधीकारी, पोलीस नियंत्रण कक्ष /आस्थापना शाखा /लेखाशाखा एबी-४/पत्रव्यवहार शाखा एसबी-४/ आस्थापना शाखा सहा. ३,४,५,६,राजपत्र लिपीक यांना पुढील उचित कार्यवाहीस.

**टिप :- वरील आदेशाप्रमाणे नाव असलेल्या उमेदवारांनी दि. २९.०५.२०२६ रोजी ११.०० वा. ड्रिलशेड पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे हजर रहावे.**